3८९५

**कृषि यांत्रिकीकरण उपअभियान २०२१-२२**
**अंतर्गत कृषि कल्याण अभियान मार्गदर्शक सुचना**
ई-मेल - ddaqc5@rediffmail.com

जा.क्र. /कृकअ/गुनि-५/नक्र११९ / /२०२२
कृषिआयुक्तालय, महाराष्ट्रराज्य, पुणे-४११००१ .
दिनांक : ०२ फेब्रुवारी २०२२

**प्रति,**

1) **विभागीय कृषि सहसंचालक, नासिक /लातूर /अमरावती/नागपूर**
2) **जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, नंदुरबार /उस्मानाबाद /वाशीम /गडचिरोली**

**विषय-सन २०२१-२२ मध्ये कृषि यांत्रिकीकरण उपअभियान अंतर्गत कृषि कल्याण अभियान योजना अंमलबजावणी करिता मार्गदर्शक सूचना...**

**संदर्भ:** १) केंद्र शासनाच्या http://farmech.dac.gov.in या संकेतस्थळावरील कृषि यांत्रिकीकरण उपअभियाना बाबत सुधारीत मार्गदर्शक सुचना-२०२०-२१
२ ) केंद्र शासनाचे पत्र क्र. 3-1/2015- M&T(I&P) दि. १० जानेवारी २०२२
३ ) शासन निर्णय क्रमांक: कृयायों- २०२२ / प्र.क्र.२० (भाग-१) /१४ -अे , दि. १७ जानेवारी २०२२
४ ) पत्र जा.क्र.महाडीबीटी -२०२२-२३/गुनि५/नक्र१६२/१५१९/२०२२ दि. १४ जानेवारी २०२२

राज्यात सन २०१४ -१५ पासुन **कृषि यांत्रिकीकरण उपअभियान** राबविण्यात येत आहे.केंद्र शासनाने कृषि यांत्रिकीकरण उपअभियानाच्या सुधारीत मार्गदर्शक सुचना २०२०-२१ निर्गमीत केल्या असुन त्या केंद्र शासनाच्या http://farmech.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत.

कृषि यांत्रिकीकरण उपअभियानामध्ये केंद्र व राज्य हिस्सा ६०:४० प्रमाणे आहे. केंद्र शासनाने संदर्भिय पत्र दि. १० जानेवारी २०२२ अन्वये सन २०२१-२२ करिता कृषी कल्याण अभियान -३ मोहिमेंतर्गत राज्यातील **नंदुरबार, उस्मानाबाद, वाशीम व गडचिरोली** या चार आकांक्षित जिल्ह्यांमध्ये " कृषि यांत्रिकीकरण उप अभियानामधील **घटक क्र.-६** " निवडक गावात कृषि यांत्रिकीकरण राबविण्यास प्रोत्साहन देणे या बाबीखाली "**भाडे तत्वावर कृषि यांत्रीकीकरण सेवा-सुविधा पुरवठ्यासाठी कृषि औजारे बॅन्क स्थापना**" यासाठी **एकूण ₹५१२.०० लाखाचे** कार्यक्रमास मान्यता प्रदान केली असुन त्यासाठी केंद्र हिश्यापोटी अनुदानाचा निधी रक्कम रुपये ३०७ .२० लाख निधी मुक्त केला आहे. सदर कार्यक्रमास शासन निर्णय दि. १७ जानेवारी २०२२ अन्वये राज्य शासनाची प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्यानुसार सन २०२०-२१ मध्ये राज्यातील **नंदुरबार, उस्मानाबाद, वाशीम व गडचिरोली** या चार आकांक्षित जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येणाऱ्या कृषि यांत्रीकीकरण उपअभियान अंतर्गत कृषि कल्याण अभियान अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात येत असून त्या कृषि विभागाच्या http://krishi.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरही उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

केंद्र शासनाने राज्यासाठी मंजुर केलेल्या कार्यक्रमाचे मर्यादेत सन २०२१-२२ मध्ये चार आकांक्षित जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील निवडक गावांमध्ये "**भाडे तत्वावर कृषि यांत्रीकीकरण सेवा-सुविधा पुरवठ्यासाठी कृषि औजारे बॅन्क स्थापना**" प्रती तालुका दोन या प्रमाणे ८० टक्के अनुदानावर आधारित कार्यक्रमाचे लक्षांक निर्धारित करण्यात आले आहेत.

**घटक क्र.६ : निवडक गावात कृषि यांत्रिकीकरणास प्रोत्साहन देण्यासाठी "भाडे तत्वावर कृषि यांत्रिकीकरण सेवा सुविधे साठी कृषि औजारे बॅन्क स्थापनेस अर्थसहाय्य "**

**१. पार्श्वभूमी :**

राज्यातील बहुतांश भाग कोरडवाहु असल्याने कृषि औजारे/उपकरणे शेतकऱ्यांना स्वत: खरेदी करण्यास मर्यादा येतात. याकरिता केंद्र शासनाने निवडलेल्या चार आकांक्षित जिल्ह्यातील निवडक गावात कृषि यांत्रिकी करण उप अभियानाच्या घटक ६ अंतर्गत कृषि यांत्रिकी करणास प्रोत्साहन देण्यासाठी कृषी औजारांच्या सेवा सुविधा शेतकऱ्यांना प्रचलीत भाडे दरापेक्षा कमी दराने उपलब्ध करुन देण्याचे दृष्टीने कृषी औजारे सेवा सुविधा केंद्रे (कृषि औजारे बॅन्क) स्थापन करणे हा प्रमुख उद्देश आहे.

**२. घटकाचे उद्देश :**

१. केंद्र शासना द्वारे निवडलेल्या चार आकांक्षित जिल्ह्यामधील निवडक गावात ज्या भागात कृषि क्षेत्रात उर्जा वापराचे प्रमाण कमी आहे तेथे यांत्रिकीकरणास प्रोत्साहन देणे.

२. निवडक गावातील सदर क्षेत्रातील पीक रचनेनुसार पिकाच्या पेरणी पासुन काढणीपश्चात प्रक्रियेपर्यंत शेतकऱ्यांना माफक दराने यांत्रिकीकरणाची सेवा — सुविधा भाडे तत्वावर उपलब्ध करुन देणे.

३. कृषी औजारे बँकेची सेवा- सुविधा भाडेतत्वावर उपलब्ध करुन लहान व सिमांतीक शेतकऱ्यांना कृषि यांत्रिकीकरण सुविधेचा लाभ देणे.

४. या प्रक्रियेत निवडक गावातील नोंदणीकृत प्रगतीशील शेतकरी गट, शेतकऱ्यांचे नोंदणीकृत गट, बचतगट व कृषि यंत्रे व औजारे उत्पादक कंपन्या यांचा अंतर्भाव करुन माफक भाडे तत्वावर शेतकऱ्यांना कृषि यांत्रिकीकरण सेवा सुविधा पुरविणे व सामुग्रीची देखभाल करणे.

५. कृषि उत्पादन प्रक्रियेत अद्ययावत यंत्र सामुग्रीचा वापर करणे.

**३. सेवा-सुविधा केंद्रे स्थापन करताना गावांच्या निवडीचे निकष:**

कृषि यांत्रिकीकरण सेवा-सुविधा केंद्र (कृषिऔजारेबॅन्क) स्थापनेसाठी गावांची निवड करताना केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार खालील निकष पाळणे बंधनकारक राहील.

अ) चार आकांक्षित जिल्ह्यामधील केंद्र शासनाद्वारे यापूर्वी निवडलेल्या गावातच या सुविधेचा लाभ देय राहील

ब) सदर निवडक गावातून ट्रॅक्टरची संख्या कमी प्रमाणात असलेली गावे.

क) निवडक गावातून अल्प व अत्यल्प जमीनधारकांचे प्रमाण अधिक असलेली गावे.

ड) सध्या कृषि उत्पादकता कमी असलेली परंतू उत्पादकता वाढीस वाव असलेली गावे.

**४.लाभार्थी निवडीची कार्यपध्दती—**

**कृषि यांत्रिकीकरण उप अभियानांतर्गत कृषि कल्याण अभियान घटक क्र.६ :** जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी स्थानिक वृत्तपत्रात प्रेस नोट / सोशल मिडिया यासारख्या विविध माध्यमातून कृषी औजारे बँक स्थापन करण्यासाठी सर्व तालुक्यातील केंद्र शासनाद्वारे निवडलेल्या निवडक गावातील **शेतकरी सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपनी, शेतकऱ्यांचे नोंदणीकृत गट, नोंदणीकृत शेतकरी बचत गट, विविध कार्यकारी सहकारी संस्था** यांना अर्ज सदर करण्यासाठी आवाहन करण्यात यावे . अर्जाचा नमुना सोबत जोडला आहे **(प्रपत्र-१)** अर्ज सादर करण्यासाठी पुरेसा कालावधी देण्यात यावा. लक्षांकापेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास काढण्यात येणाऱ्या सोडतीचा दिनांक सर्व संबंधिताना अवगत करावा. सर्व तालुक्यांची सोडत एकाच दिवशी उप विभागीय कृषि अधिकारी कार्यालयाचे ठिकाणी काढण्यात यावी, सोडतीद्वारे लाभार्थी निवडीचे ठिकाण, दिनांक व वेळ तसेच अर्ज स्विकृतीपासून ते सोडतीपर्यंतचे संपूर्ण नियोजन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, कृषि उपसंचालक व संबंधीत उप विभागीय कृषि अधिकारी यांनी करावयाचे आहे. तसेच मा. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीच्या मान्यतेने लाभार्थी निवड करावयाची असल्याने याकरीता

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी ही सोडत काढण्यास जिल्हास्तरीय कार्यकारी समितीची मान्यता घ्यावी. या योजनेत मर्यादित स्वरुपात लक्षांक असल्याने उपविभागीय कृषि अधिकारी यांनी उपविभागीय कार्यालयाच्या ठिकाणी तालुकानिहाय सोडत काढावयाची आहे. ज्या तालुक्याची सोडत काढावयाची आहे, त्याची जबाबदारी संबंधित उप विभागीय कृषि अधिकारी, व संबंधित तालुका कृषि अधिकारी यांची राहील. तसेच संबंधीत उप विभागीय कृषि अधिकारी आवश्यकतेनुसार उप विभागातील मंडळ कृषि अधिकारी यांची मदत घेऊ शकतील.

कृषि औजारे बॅन्क स्थापना अंतर्गत कृषि औजारे बॅन्क घटकाचा लाभ घेण्यासाठी प्राधान्याने शेतकरी सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपनी, शेतकऱ्यांचे नोंदणीकृत गट,नोंदणीकृत शेतकरी बचत गट, या पैकी इच्छुक अर्जदारांची निवड करावी. केवळ याच योजनेसाठी अर्ज सादर करण्याची पद्धत फक्त ऑफ लाईन अर्जाद्वारे असेल.
या घटकाचा लाभ घेण्या करीता अर्जदाराने पुढील कागदपत्रे सादर केली असणे आवश्यक आहे.

१.संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र.

२.खरेदी करावयाच्या यंत्र/औजारे संचाचे दरपत्रक व परिक्षण पुरावा. (Test Report)

३.आधारकार्ड संलग्न बँक खात्याच्या पासबुकाच्या पहिल्या पृष्ठाची छायांकित प्रत.

४. संस्थेशी संबंधीत व्यक्तीच्या बॅन्क खात्यात अनुदान जमा करण्यास संस्थेने प्राधीकृत केले असल्यास प्राधीकृत केल्याचे पत्र व संबंधीत व्यक्तीच्या आधारकार्ड/फोटो असलेल्या ओळखपत्राची स्वयंसाक्षांकित प्रत.

**उद्दिष्टा इतके अर्ज प्राप्त न झाल्यास करावयाची कार्यवाही :-**

१. तालुक्यामध्ये नेमून दिलेल्या उद्दिष्ठां इतके अर्ज प्राप्त न झाल्यास त्या तालुक्यासाठी पुन:श्च प्रसिद्धी देवून अर्ज मागवावेत आणि प्राप्त होणाऱ्यां अर्जातून लाभार्थी निवडी साठी उपरोक्त विहित कार्यपध्दतीनुसार आवश्यक कार्यवाही करावी.

२. एखाद्या तालुक्यात नेमून दिलेल्या उद्दिष्ठां इतके अर्ज प्राप्त न झाल्यास तो निधी इतर तालुक्यास वर्ग करता येणार नाही. तालुका निहाय लक्षांक देण्यात आलेला असल्याने कोणत्याही स्थितीत एखाद्या तालुक्याचा निधी दुस-या तालुक्यास देता येणार नाही.

**५. लाभार्थी निवडीनंतर करावयाची कार्यपध्दती-**

१) लाभार्थींची निवड पुर्ण झाल्यानंतर सदर लाभार्थीस पुढील अटी व शर्ती मान्य करण्याचे अधिन राहुन तालुका कृषि अधिकारी यांनी पुर्वसंमती प्रदान करावी. **(प्रपत्र-२ )** स्थापन करावयाच्या औजारे बॅन्केद्वारे शेती व्यवसायाशी निगडीत कामे करणे बंधनकारक राहील. इतर प्रकारच्या व्यापारी/व्यवसायासाठी या सुविधेचा लाभ देता येणार नाही.

२) संबंधीत अर्जदाराकडे कृषि यांत्रिकीकरण सेवा-सुविधा पुरविण्यासाठी आवश्यक प्रशिक्षीत, अनुभवी व पुरेसे मनुष्यबळ असणे बंधनकारक राहील. तसेच, सदर यंत्रसामुग्री व उपकरणे सुरक्षित व सुस्थितीत ठेवण्यासाठी आवश्यक जागा व शेडची व्यवस्था असणे बंधनकारक राहील. जिल्हयातील पीक रचनेनुरुप आवश्यक असणाऱ्या जमीनीची पूर्वमशागत ते पीक काढणी पश्चात तंत्रज्ञानासाठी आवश्यक सर्व यंत्रसामुग्री व उपकरणे संबंधीतांनी माफक भाडेतत्वावर उपलब्ध करुन देऊन त्यांच्या सेवा शेतकऱ्यांना वेळोवेळी पुरविणे बंधनकारक राहील.

३) लाभधारकाने कृषि यांत्रिकीकरण सेवा-सुविधा शेतकऱ्यांना पुरविल्याबाबत आवश्यक अभिलेख ठेवणे व त्याचा नियमीत अहवाल सादर करणे बंधनकारक राहील. तसेच, याबाबत तपासणीच्या वेळी सर्व यंत्रसामुग्री/उपकरणे व अभिलेख सादर करणे बंधनकारक राहील. अभिलेख नोंदणीचे प्रपत्र सहपत्रीत केले आहे. **(प्रपत्र-६ )**

४) सदर कार्यक्रमांतर्गत पुरविण्यात येणाऱ्या यंत्रसामुग्री व उपकरणे यांची नियमीत देखभाल व दुरुस्ती करण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत लाभधारक संस्थेची राहील. संबंधीत सेवा-सुविधा केंद्रे व्यवस्थित चालविणे व वेळोवेळी त्यात सुधारणा करण्याची तयारी असणे आवश्यक राहील.

५) सदर यंत्रसामुग्री व उपकरणे यांची परिवहन विभागाकडे नोंदणी (रजिस्ट्रेशन), विमा, कर भरण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत लाभधारक संस्थेची राहील.

६) यासाठी मार्गदर्शक सुचनां सोबत सहपत्रीत केलेल्या हमीपत्रानुसार बॉन्डपेपरवर हमीपत्र सादर करणे संबंधीत लाभधारकांना बंधनकारक राहील. **(प्रपत्र-५ )**

७) लाभार्थी सदर केंद्र ६ वर्ष पुर्ण होण्यापुर्वी ते हस्तांतरीत/विक्री/गहाण ठेऊ शकत नाही.

८) सदर लाभार्थ्यास अनुदानावर मिळणाऱ्या औजारांचे कोणत्याही परिस्थितीत पुढील किमान ६ वर्षे हस्तांतरण, पुर्नविक्री किंवा गहाण ठेवता येणार नाहीत. या कालावधीत त्यांना कृषि औजारे सेवा सुविधा पुरविणे बंधनकारक राहील.

९) संबंधीत लाभधारकांसाठी त्यांना आवश्यक असलेल्या यंत्रसामुग्री व औजारांची त्यांच्या कार्यक्षेत्रातील पीक रचनेनुसार निवड करावी.

१०) प्रत्येक लाभधारक सेवा-सुविधा केंद्राची सेवा-सुविधा पुरविण्याची क्षमता किमान १० हेक्टर प्रती दिवस आणि किमान ३०० हेक्टर प्रती कृषि हंगाम क्षेत्रासाठी असणे बंधनकारक राहील.

११) केंद्र शासनाच्या **“FARMS”**या मोबाईल ॲप वर नोंदणी करून भाडे तत्वावर द्यावयाच्या यंत्र औजाराची माहिती भरणे आवश्यक राहील.

ज्या संस्थांना / गटांना यापूर्वी कृषि यांत्रिकीकरण सेवा सुविधा पुरवठयासाठी लाभ देण्यात आला आहे अशा गटांची फेर निवड करण्यात येवू नये. वरील निकषांव्यतिरिक्त योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीच्या दृष्टीने स्थानिक परिस्थितीनुरुप आवश्यक ते अतिरिक्त निकष जिल्हास्तरीय समितीने ठरविण्यास हरकत नाही.

**६. भौतीक/आर्थीक लक्षांक —घटक क्र.६** चा जिल्हानिहाय भौतीक/आर्थीक लक्षांकाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

**कृषि यांत्रिकी करण उप अभियान अंतर्गत घटक ६ : कृषि कल्याण अभियान — III**

**जिल्हा निहाय लक्षांक**

| अ क्र | आकांक्षित जिल्हा | एकूण तालुके | औजारे बँका | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | औजारे बँक संख्या | एकूण रक्कम लाख | अनुदान दर % | लागणारे अनुदान लाख | केंद्र हिस्सा | राज्य हिस्सा |
| १ | नंदुरबार | ६ | १२ | १२०.०० | ८० | ९६.०० | ५७.६० | ३८.४० |
| २ | गडचिरोली | १२ | २४ | २४०.०० | ८० | १९२.०० | ११५.२० | ७६.८० |
| ३ | वाशीम | ६ | १२ | १२०.०० | ८० | ९६.०० | ५७.६० | ३८.४० |
| ४ | उस्मानाबाद | ८ | १६ | १६०.०० | ८० | १२८.०० | ७६.८० | ५१.२० |
| | एकूण | ३२ | ६४ | ६४०.०० | | ५१२.०० | ३०७.२० | २०४.८० |

**७ . औजारे/उपकरणांची निवड :**

**कृषी यांत्रिकीकरण उपअभियानातील घटक क्र ३ अंतर्गत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचानांमधील समविष्ट यंत्र व औजारानाच अनुदान अनुज्ञेय राहील.** स्थानिक परीस्थितीनुरूप त्यामधील निवडक औजारांचा संच करून त्याप्रमाणे खरेदी करणे आवश्यक राहील.औजारे बँकेस काढणी पश्चात तंत्रज्ञानावर आधारित यंत्र सामुग्री व

वाहतूक साधनाची जोड दिल्यास सदर सेवा सुविधा केंद्र वर्षभर कार्यरत राहून स्थानिक भागातील शेतकऱ्यांच्या या विषयीच्या गरजा भागविता येऊ शकतील. यास्तव काढणी पश्चात तंत्रज्ञानावर आधारित यंत्र सामुग्री व वाहतूक साधनाची जोड देणाऱ्या औजारे बँकेस प्रथम प्राधान्य देण्यात यावे.

औजारे बँक स्थापनेसाठी भांडवली गुंतवणुकीच्या ८० टक्के किंवा अनुदानाची उच्चतम मर्यादा रुपये ८ लाख यापैकी कमी असेल त्या मर्यादेपर्यंत अनुदान अनुज्ञेय राहिल. या योजने अंतर्गत केवळ १० लाख क्षमतेच्या औजारे बँक स्थापनेस अनुमती आहे. त्यापेक्षा जास्त क्षमतेच्या औजारे बँकेस अनुदान देय राहणार नाही.

| अ.क्र. | औजारे बँक स्थापनेचा खर्च | अनुदानाची उच्चतम मर्यादा | अर्थसहाय्य |
|---|---|---|---|
| १ | ₹१०.०० लाख पर्यंत ( जी एस टी वगळता ) | ₹८.0 लाख | ८० टक्के |

कृषी आयुक्तालायाचे पत्र क्र.महाडीबीटी -२०२२-२३/गुनि५/नक्र१६२/१५१९/२०२२ दि. १४ जानेवारी २०२२ अन्वये कृषी औजारे बँकेच्या संदर्भात सविस्तर सूचना देण्यात आलेल्या आहेत त्यानुसार उचित कार्यवाही करण्यात यावी.

**९. अनुदान अदायगीची कार्यपध्दती -**

लाभधारकाने पुर्वसंमती नुसार खुल्या बाजारातुन औजारे खरेदी केल्यानंत खरेदीची पावती अनुदान मागणी साठी संबंधीत तालुका कृषि अधिकारी यांचे कडे सादर करावी.

तालुका कृषि अधिकारी यांनी लाभधारकांच्या प्राप्त प्रकरणांची प्रत्यक्ष तपासणी करणे साठी जिल्हास्तरीय संयुक्त तपासणी पथकास शिफारस करावी. जिल्हास्तरीय संयुक्त तपासणी पथकाने प्रत्यक्ष औजारे बँक स्थापन करण्यात आलेल्या स्थळी भेट देवून त्याचे प्रयोजनासह खात्री करावी. सदर पथकात संबंधीत उपविभागीय कृषि अधिकारी, कृषी उप संचालक (जि.अ.कृ.अ कार्यालय ) व संबंधीत तालुका कृषि अधिकारी यांचा समावेश राहील. सदर संयुक्त पथक जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे अधिनस्त कार्यरत राहील. औजारे बॅन्कसाठी सर्व औजारांची निर्धारीत मानकांनुसार खरेदी केल्याची व विमा, कर इत्यादी भरणा केल्याची खात्री तपासणी पथकाने करावी. सदर पथकाने सोबत सहपत्रीत केलेल्या संयुक्त तपासणी प्रपत्राचे **(प्रपत्र-३)** नमुन्यात सर्व नोंदी करुन स्वाक्षरी करावी. सदर पथकाच्या प्रत्यक्ष तपासणीनंतरच संबंधीत लाभधारकांस अनुदान अनुज्ञेय राहील. संयुक्त तपासणी पथकाच्या अहवालाची एक प्रत त्यांनी लाभधारकास द्यावी. तपासणीनंतर तालुका कृषि अधिकारी यांनी सदर लाभधारकास अनुदान अदायगीसाठी जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांना कळवावे. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांनी अनुदानाची रक्कम १५ दिवसांच्या आत लाभार्थीच्या आधार संलग्न बॅन्क खात्यात जमा करायची आहे.त्यानुसारजिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांच्याकडे अनुदान उपलब्ध असल्यासच १५ कार्यालयीन दिवसांमध्ये अनुदान अदा करण्याचे त्यांच्यावर बंधनकारक राहील.

घटक ६ अंतर्गत लाभ घेतलेल्या संस्था/गटांचा तपशील औजारांच्या यादिसह संबंधीत ग्रामपंचायत फलकावर, मंडळ कृषि अधिकारी कार्यालय, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, उपविभागीय कृषिअधिकारी कार्यालय, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालय, कृषि विभागाचे वार्तांफलक तसेच तलाठी कार्यालय, तहसीलदार कार्यालय व जिल्हाधिकारी कार्यालय येथील फलकावर प्रदर्शीत करण्यात यावा. केंद्र शासनाच्या **"FARMS"**या मोबाईल ॲप वर नोंदणी करून भाडे तत्वावर द्यावयाच्या यंत्र औजाराची माहिती भरली असल्याची खातरजमा करण्यात करण्यात यावी.

**१०. संनियंत्रण :** सदर कार्यक्रमातर्गत स्थापित कृषि यांत्रीकीकरण सेवा-सुविधा केंद्रांचे (औजारेबॅन्केचे )पर्यवेक्षण जिल्हा अधिक्षक कृषिअधिकारी यांनी करावयाचे असुन **जिल्ह्यात स्थापन औजारे बॅन्कांचे तालुकानिहाय भाड्याचे प्रती औजार, प्रती तास/दिवस, प्रती हेक्टर भाडे दर निर्धारीत करुन त्यानुसार भाडे आकारणीबाबत** जिल्हास्तरावर अंमलबजावणीचे सर्वस्वी संनियंत्रण करावे. सदर केंद्रे ज्या हेतूने स्थापन करण्यात येत आहेत त्यानुसार काम करतील, सदर

क्षेत्रातील प्राधान्याने अल्प व अत्यल्पभूधारक शेतकऱ्यांना प्रचलीत भाडेदरापेक्षा किमान २५ टक्के कमी दराने सेवा-सुविधा पुरविली जाईल, केंद्रे पूर्ण क्षमतेने कार्यरत राहतील हे तपासण्याची, वेळोवेळी त्यांना सुचना देण्याची व आवश्यकतेनुरुप कार्यवाही करण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांची राहील. याबाबत संबंधीत उपविभागीय कृषि अधिकारी,तालुका कृषि अधिकारी यांचे समन्वयाने कार्यवाही करावी. त्यांचीही सदर प्रक्रीयेत तेवढीच जबाबदारी राहील.

**तपासणी संस्था व त्यांनी तपासणी करावयाच्या औजारांचा तपशील-**

लाभार्थींनी खरेदी करावयाची औजारे केंद्रीय तपासणी संस्था किंवा केंद्र शासनाने मान्यता दिलेल्या संस्थांकडून तपासणी केलेली असणे बंधनकारक असुन त्यांनाच अनुदान अनुज्ञेय राहील.

**१. केंद्रीय तपासणी संस्था**-केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांमध्ये नमुद केल्यानुसार केंद्रीय तपासणी संस्था व त्यांनी तपासणी करावयाच्या औजारांचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | केंद्रीय तपासणी संस्थेचे नाव | तपासणी करावयाची औजारे/उपकरणे/मशिन्स |
|---|---|---|
| 1 | केंद्रीय कृषि मशीनरी प्रशिक्षण व तपासणी संस्था, बुधनी(CFMTTI, Budni) | ट्रॅक्टर, पॉवरटीलर व इतर स्वयंचलीत मशीन्स. |
| 2 | उत्तर क्षेत्रीय कृषि मशीनरी प्रशिक्षण व तपासणी संस्था, हिस्सार(NRFMTTI, Hissar) | पीक संरक्षण उपकरणे व इतर स्वयंचलीत पीक उत्पादक उपकरणे व मशीन्स. |
| 3 | दक्षीण क्षेत्रीय कृषि मशीनरी प्रशिक्षण व तपासणी संस्था, गार्लेंडीन (SRFMTTI, Garladinne) | पॉवर टीलर व इतर स्वयंचलीत पीक उत्पादक मशीन्स, पॉवर/उर्जा चलीत उपकरणे व मशीन्स. |
| 4 | उत्तर पुर्व क्षेत्रीय कृषि मशीनरी प्रशिक्षण व तपासणी संस्था, बीश्वनाथचारीअली, आसाम (NERFMTTI, Biswanath Chariali (Assam)) | पॉवर/उर्जा चलीत उपकरणे व मशीन्स.स्वयंचलीत नसलेली उपकरणे |

**२. केंद्र शासनाच्या मान्यताप्राप्त तपासणी संस्था -**

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांमध्ये स्वयंचलीत नसलेली सर्व औजारे/उपकरणे यांची तपासणी परिशिष्टक्र.V मधील नमुद तपासणी संस्थांनी करावी असे नमुद केले आहे. त्याव्यतीरीक्त भारतीय मानक संस्थेचे वैध मानांकनधारक औजारांनाही अनुदान अनुज्ञेय राहील. परिशिष्ट क्र. V नुसार मान्यता दिलेल्या ३५ तपासणी संस्थांचा तपशील केंद्र शासनाच्या (http://farmech.dac.gov.in) संकेतस्थळावरही उपलब्ध आहे.

**तपासणी/परीक्षण प्रमाणपत्र /पुरावा सादर करण्याची आवश्यकता नसलेली औजारे -**

**१. ट्रॅक्टर व पॉवर टीलर्स -**

केंद्र शासनाने योजनांतर्गत पुरवठ्यासाठी अनुदानास पात्र असलेल्या ट्रॅक्टर्स व पॉवर टीलर्सच्या मॉडेल्सची यादी केंद्रशासनाच्या संकेतस्थळावर (http://farmech.dac.gov.in) उपलब्ध करुन दिली जाते व वेळोवेळी अद्यावत करण्यात येते.त्याप्रमाणे अद्ययावत यादी वेळोवेळी क्षेत्रीयस्तरावर देखिल निर्गमीत केली जात असुन सुलभतेच्या दृष्टीने सदर यादी कृषि विभागाच्या http://krishi.maharashtra.gov.in यासंकेतस्थळावर सुध्दा प्रसिध्द केली जाते.**ट्रॅक्टर्स व पॉवर टीलर्सच्या यादीत वेळोवेळी अंतर्भाव केल्या जाणाऱ्या मॉडेल्सचा अद्ययावत तपशील उपरोक्त संकेतस्थळावरुन पहावा.ट्रॅक्टर्स व पॉवर टीलर्सच्या केंद्र शासनाने शिफारस केलेल्या यादीतील मॉडेल/मेकलाच अनुदान अनुज्ञेय असुन केंद्र शासनाच्या यादी व्यतीरीक्त इतर ट्रॅक्टर्स व पॉवर टीलर्सला अनुदान देय राहणार नाही.**तसेच केंद्र शासनाच्या यादीतील ट्रॅक्टर्स व पॉवर टीलर्स करीता लाभार्थीस तपासणी प्रमाणपत्र/पुरावा सादर करण्याची आवश्यकता नाही, याची नोंद घ्यावी.

**२.** केंद्र शासनाच्या योजनांतर्गत पुरवठ्यासाठी अनुदानास पात्र असलेल्या औजारांचे यादीमध्ये समाविष्ट रिपर, रिपर कम बाईंडर, पॅडी ट्रान्सप्लांटर, थ्रेशर, पावर विडर या यंत्रे/औजारांच्या मॉडेल /मेकलाच अनुदान अनुज्ञेय असुन सदर यादीतील औजारे लाभार्थींनी खरेदी केल्यास त्याबाबत परिक्षण अहवाल / प्रमाणपत्र / पुरावा सादर करण्याची आवश्यकता राहणार नाही.

उपरोक्त नमुद मुद्दा १ व २ व्यतिरीक्त इतर यंत्रांची / औजारांची खरेदी करण्याचा लाभार्थींचा मानस असल्यास, त्यांनी विक्रेत्यांकडून सदर यंत्र /औजारांबाबत सक्षम संस्थेने दिलेल्या वैध परिक्षण प्रमाणपत्राचा पुरावा सादर करणे बंधनकारक राहील. मात्र यासंदर्भात केंद्र शासनाच्या दि. २७ जून २०१९ च्या पत्रामध्ये नमूद अटीचे पालन करणे आवश्यक राहील. त्याप्रमाणे मान्यताप्राप्त तपासणी संस्थेने दिलेल्या तपासणी अहवालाची संपूर्ण प्रत, तपासणी अहवालाची वैधता, असल्याची खातरजमा संबंधित तालुका कृषी अधिकारी यांनी करणे अनिवार्य आहे. आयुक्तालयाचे पत्र जा.क्र/उत्पादक माहिती/एम्बास/२०१८-१९ /२२८/गुनि-५/२०१७, दि. १६ मे २०१८ अन्वये उत्पादकांना त्यांचे उत्पादीत यंत्र/ औजारांवर परिक्षण अहवाल क्रमांक व मॉडेल क्रमांक Emboss करणेबाबत कळविले आहे. त्यानुसार संबंधीत कंपनीने यंत्र/ औजारांवर परिक्षण अहवाल क्रमांक व मॉडेल क्रमांक Emboss केलेला आहे याची खातरजमा करणे आवश्यकराहील.

**अहवाल** :सदर कार्यक्रमांतर्गत भौतीक/आर्थीक साध्याचा आढावा मा.प्रधानमंत्री कार्यालयाकडून घेण्यात येत असल्याने याबाबतचा प्रगती अहवाल विहीत प्रपत्रात नियमीतपणे दर महीन्याच्या २ तारखेपर्यंत न चुकता सादर करणे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना बंधनकारक राहील.

**तपासणी टक्केवारी -**

योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी संनियंत्रण अधिका-यांनी पुढीलप्रमाणे खर्चाच्या प्रमाणात तपासणी करावी.संनियंत्रण तपासणी अहवालाचा नमुना सोबत जोडला आहे. (**प्रपत्र- ४** )

| **अधिकारी** | **तपासणी टक्केवारी** |
|---|---|
| १. विभागीय कृषि सहसंचालक | १० टक्के |
| २. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | २५ टक्के |
| ३. तालुका /उपविभागीय कृषि अधिकारी | १०० टक्के |

दिलीप झेंडे
**संचालक (नि.व गुनि )**
**कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे**

**प्रत :** १. श्री. श्रीकांत आंडगे, अवर सचिव, कृषी १४ अे मंत्रालय मुंबई यांना माहितीसाठी
२. कृषी उपसंचालक, आयुक्त कृषी कक्ष यांना माहितीसाठी

**प्रपत्र -१**

**अर्जाचा नमुना - 'औजारे बॅन्क स्थापनेसाठी अनुदान मिळणेकरीता अर्ज'**

**कृषि यांत्रीकीकरण उपअभियान सन २०२१-२२ अंतर्गत कृषी कल्याण अभियान -फेज ३**

**घटक क्र. ६ : 'कृषि औजारे बॅन्क स्थापनेसाठी अर्थसहाय्य'**

**प्रति,**

**तालुका कृषि अधिकारी,**

**……………, ………………**

**विषय :- कृषि यांत्रीकीकरण उपअभियान सन २०२१-२२ मधील घटक क्र.-६ 'कृषि औजारे बॅन्क स्थापनेसाठी अर्थसहाय्य' योजनेचा लाभ मिळणेबाबत...**

महोदय,

मी/आम्ही उपरोक्त विषयामध्ये नमुद केलेप्रमाणे आपलेकडील कृषि यांत्रीकीकरण उपअभियान सन २०२०-२१ अंतर्गत घटक क्र.६: निवडक गावात कृषी यांत्रिकीकरणास प्रोत्साहन अंतर्गत **'कृषि औजारे बॅन्क स्थापनेसाठी अर्थसहाय्य'** या घटकाचा कृषी कल्याण अभियान -३ मधून लाभ घेवु इच्छित आहे. सदर योजनेच्या अनुदानातून शासनाने निश्चित केलेल्या नियमानुसार अर्जामध्ये नमुद केलेल्या औजार/यंत्रे/ उपकरणाच्या खरेदीकरीता पुर्वसंमती मिळावी व अनुदान उपलब्ध होवून मिळावे, ही विनंती.

**१. अर्जदाराची माहिती :**

| | |
|---|---|
| **१. अर्जदार संस्थेचे नांव:** | |
| **२. अर्जदाराचा प्रकार** (लागु असलेल्या ठिकाणी √ खूण करावी.) | शेतकरी उत्पादक कंपनी/ शेतक-यांचे स्वयंसहाय्यता गट/ शेतकरी उत्पादक गट/कृषि विज्ञान केंद्रे/ ………………………… (इतर) |

**२. अर्जदार संस्थेचा पत्ता :**

| | | | |
|---|---|---|---|
| **ठिकाण** | | **गांव** | |
| **तालुका** | | **जिल्हा** | |
| **पिन** | | **फोन नं./मो.नं.** | |

३. **संस्थेचा तपशील/ अथवा ज्या व्यक्तीच्या बॅन्क खात्यात अनुदान जमा करण्यास संस्थेने प्राधीकृत केले आहे अशा व्यक्तीचा तपशील.**

| | | | |
|---|---|---|---|
| **व्यक्तीचे/संस्थेचे नांव** | | | |
| **संस्थेशी संबंध** | | | |
| **ठिकाण** | | **गांव** | |
| **तालुका** | | **पिन** | |
| **जिल्हा** | | **फोन नं. /मो.नं** | |

| आधार क्रमांक | | खाते असलेल्या बॅन्केचे नाव | |
|---|---|---|---|
| बॅन्क खाते क्रमांक | | बॅन्केचा IFSC कोड | |

**४. अर्जदाराने/संस्थेने धारण केलेल्या शेतजमिनीचा 7/12 व 8-अ प्रमाणे तपशील:**

| अ.क्र. | सर्व्हे/गट क्रमांक | क्षेत्र (हे.आर.) |
|---|---|---|
| १. | | |
| २. | | |

**१. अनुदानावर खरेदी करावयाच्या औजार/ उपकरणाचा तपशील:**

| अ. क्र. | खरेदी करावयाच्या औजार/ यंत्राचे नाव व तपशील | मॉडेल | उत्पादकाचे /कंपनीचे नांव | औजार/ यंत्राची किंमत |
|---|---|---|---|---|
| १. | | | | |
| २. | | | | |
| ३. | | | | |
| ४. | | | | |
| ५. | | | | |
| ६. | | | | |
| | **एकूण किंमत** | | | |

**५. मी याद्वारे घोषित करतो/करते की, उपरोक्त योजनेंतर्गत अनुदानावर उपरोक्त नमुद कृषी औजारे बँक स्थापनेसाठी पूर्वसंमती मिळणेबाबत विनंती आहे. खालील नमुद अटींची मला जाणिव असुन त्या मला मान्य आहेत.**

१. औजाराची खरेदी किमतीची पुर्ण रक्कम भरुन खुल्या बाजारातुन औजाराची खरेदी करण्यास संस्था तयार आहे.
२. औजारे बॅन्क स्थापनेकरीता बॉन्ड पेपरवर हमीपत्र सादर करणे बंधनकारक आहे, याची मला जाणीव आहे.
३. ठरवून दिलेल्या माफक भाडेतत्वावर कृषि यांत्रीकीकरण सेवा-सुविधा पुरविण्यास आमची तयारी आहे.
४. अनुदानाची रक्कम माझे आधार संलग्न बॅन्क खात्यामध्ये थेट जमा केली जाईल याची मला कल्पना आहे, त्याकरीता मी माझे बॅन्क खाते आधार क्रमांकाशी जोडलेले आहे.
५. मी औजार/उपकरण खुल्या बाजारातुन माझ्या पसंतीने खरेदी करणार असल्याने औजार/उपकरणाच्या गुणवत्तेची सर्वस्वी जबाबदारी माझी राहील याची मला जाणीव आहे.
६.तसेच यापुर्वी मी उपरोक्त प्रस्तावासाठी किंवा त्याच्या काही भागासाठी कोणत्याही शासकीय/निमशासकीय यंत्रणेकडून अनुदान/आर्थिक मदत घेतलेली नाही.
७. औजारे खरेदीकरीता पुर्वसंमती मिळाल्यानंतर एक महिन्याच्या कालावधीत औजारे/यंत्रांची खुल्या बाजारातुन खरेदी करणे आवश्यक आहे, अन्यथा प्रदान केलेली पुर्वसंमती रद्द होईल, याची मला जाणीव आहे.

८.मला औजारे खरेदीकरीता पुर्वसंमती मिळाल्यानंतर औजारे/यंत्रांची खुल्या बाजारातुन खरेदी करताना संस्थेच्या बॅन्क खात्यातुन इलेक्ट्रॉनिक पध्दतीने(आर.टी.जी.एस. ईत्यादी)/धनादेश/धनाकर्षाद्वारे विक्रेत्यास रक्कम अदा करणे बंधनकारक आहे, याची मला जाणीव आहे.

९.केंद्र व राज्य शासनाच्या अधिकृत सक्षम तपासणी संस्थांनी ज्या यंत्र/औजाराचे रीतसर परिक्षण (Testing) करुन ते BIS अथवा अन्य सक्षम संस्थांनी निश्चित केलेल्या प्रमाणकानुसार(standards)/ तांत्रिक निकषांनुसार असल्याचे प्रमाणीत केले असेल, त्याच यंत्र/औजाराची खुल्या बाजारातुन खरेदी करावयाची असुन अनुदानाकरीता देयक सादर करताना त्याचे प्रमाणपत्र/तपासणी अहवाल सादर करणे बंधनकारक आहे.

१०. कृषि यांत्रीकीकरण सेवा-सुविधा पुरविण्यासाठी आवश्यक अनुभव, प्रशिक्षीत, अनुभवी व पुरेसे मनुष्यबळ असणे, यंत्रसामुग्री व उपकरणे सुरक्षीत व सुस्थितीत ठेवण्यासाठी आवश्यक जागा व शेडची व्यवस्था असणे बंधनकारक राहील. सर्व यंत्रसामुग्री व उपकरणे संबंधीतांनी माफक भाडे तत्वावर उपलब्ध करुन त्यांच्या सेवा शेतक-यांना वेळोवेळी पुरविणे बंधनकारक राहील.

११. संस्थेने कृषि यांत्रीकीकरण सेवा-सुविधा शेतक-यांना पुरविल्याबाबत आवश्यक अभिलेख ठेवणे व त्याचा नियमीत अहवाल सादर करणे बंधनकारक राहील. तसेच, याबाबत तपासणीच्या वेळी सर्व यंत्रसामुग्री/उपकरणे व अभिलेख सादर करणे बंधनकारक राहील.

१२. सदर कार्यक्रमांतर्गत पुरविण्यात येणा-या यंत्रसामुग्री व उपकरणे यांची नियमीत देखभाल व दुरुस्ती करण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत लाभधारक संस्थेची राहील. संबंधीत सेवा-सुविधा केंद्रे व्यवस्थित चालविणे व वेळोवेळी त्यात सुधारणा करण्याची तयारी असणे आवश्यक राहील.

१३. सदर यंत्रसामुग्री व उपकरणे यांची परिवहन विभागाकडे नोंदणी (रजिस्ट्रेशन), विमा, कर भरण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत लाभधारक संस्थेची राहील.

**६. मी अर्जासोबत पुढील कागदपत्रांच्या स्वयंसाक्षांकित प्रती जोडत आहे.(लागु असलेल्या ठीकाणी √ खुण करावी.)**

१. आधार कार्ड/फोटो असलेल्या ओळखपत्राची स्वयंसाक्षांकित प्रत.

२. खरेदी करावयाच्या यंत्र/औजारंाचे अधिकृत विक्रेत्याचे दरपत्रक/कोटेशन.

३. बँक पासबुकाच्या पहिल्या पृष्ठाची छायांकित प्रत / रद्द केलेला धनादेश.

४. संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र.

५. संस्थेशी संबंधीत व्यक्तीच्या बॅन्क खात्यात अनुदान जमा करण्यास संस्थेने प्राधीकृत केले असल्यास प्राधीकृत केल्याचे पत्र.

**ठिकाण:** **अर्जदाराची स्वाक्षरी**

**दिनांक:** **नांव-** ------------------------------

**टीप-** १. ज्या शेतक-यांनी अद्याप आधार नोदणी केली नसेल, त्यांनी तात्काळ आपले नजीकचे आधार नोंदणी केंद्राशी संपर्क साधुन आधार नोंदणी करुन घ्यावी.

२. अनुदानाचा लाभ घेणेकरीता पुर्वसंमती प्रदान केल्यानंतर पुर्वसंमती पत्रात नमुद केलेल्या कागदपत्रांच्या स्वयंसाक्षांकित प्रती देयकासोबत सादर करणे आवश्यक राहील.

**प्रपत्र — २**

**कृषी कल्याण अभियान - - सन २०२१-२२**

**पूर्व-संमतीचे पत्र**

जा.क्र. ताकृअ / उशेसशे/यांत्रि./ /20 ....

तालुका कृषि अधिकारी, -------------,

दिनांक :-

**प्रति,**

-------------------------------(लाभार्थ्याचे नाव व पत्ता)

विषय : **'कृषि यांत्रिकी करण उप अभियान अंतर्गत कृषि कल्याण अभियान (घटक क्रमांक -६ )** ------ -------------- **( कृषि औजारे बँक ) स्थापने करिता पूर्व - संमती प्रदान करणेबाबत.**

संदर्भ : १. या कार्यालयाचे सम क्रमांकित पत्र दि. ------

२ . आपला पूर्व - संमती प्रदान करणेबाबत सादर प्रस्ताव दि. ------

उपरोक्त विषयान्वये "'**कृषि यांत्रिकी करण उप अभियान अंतर्गत कृषि कल्याण अभियान (घटक क्रमांक -६ )**" या मोहिमेंतर्गत **कृषि औजारे बँक स्थापना** या घटकासाठी आपण खाली नमूद केलेली यंत्रे /औजारे खरेदीकरिता अनुदान मिळणेसाठी अर्ज केला होता व सदर बाबी करिता आपली निवड झाल्याचे या कार्यालयाच्या सम क्रमांकित पत्र दि. ------ ------------------------------------------------------------ अन्वये कळविण्यात आले होते. त्यानुषंगाने, आपण सदर **कृषि औजारे बँक स्थापना** च्या खरेदीकरिता अनुदान मिळणेसाठी आपला प्रस्ताव या कार्यालयास विहित कागदपत्रांसह सादर केलेला आहे.

आपल्या प्रस्तावाची छाननी केली असता आपण अनुदानास पात्र लाभार्थी असल्याची तसेच, आपण खरेदी करू इच्छित असलेले खालील तक्त्यात नमूद यंत्रे /औजारे अनुदानास पात्र असल्याची माझी खात्री झालेली आहे.

**सबब, आपणास सदर औजारे बँक स्थापित करण्यासाठी खाली नमूद यंत्रे /औजारे च्या खरेदी करिता पूर्व -संमती प्रदान करण्यात येत आहे.** तसेच, आपण सादर केलेल्या कोटेशन नुसार खरेदी पश्चात आपणास पुढीलप्रमाणे विवरणानुसार अनुदान शासनाकडून देय राहील.

| | **कृषि औजारे बँक अंतर्गत खरेदी करावयाची यंत्रे / औजाराचे विवरण** | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| यंत्र /औजाराचे नाव | कंपनीचे नाव व मॉडेल क्र. | परिक्षण संस्थेचे नाव | परीक्षण अहवाल क्र. | यंत्र / औजार अनुदानास पात्र आहे किंवा नाही | कोटेशन नुसार किंमत | अनुज्ञेय अनुदानाची रक्कम (अंक व अक्षरी) |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

आपण, 1) तत्काळ उपरोक्त नमूद------------------------------ (यंत्र / औजाराची नावे लिहावे) खरेदी अधिकृत विक्रेत्याकडून करावी. 2) सदर यंत्र/औजारांवर संबंधीत कंपनीने त्यांचा परिक्षण झाल्याबाबतचा मॉडेल क्रमांक व सांकेतिक क्रमांक कोरणे (Emboss) बंधनकारक आहे. खरेदी करताना सदर यंत्र/औजारांवर संबंधीत कंपनीने त्यांचा परिक्षण झाल्याबाबतचा मॉडेल क्रमांक व सांकेतिक क्रमांक कोरला/Emboss केला असल्याची खात्री करावी. 3) खरेदी करताना स्वत:च्या बॅन्क खात्यातुन इलेक्ट्रॉनिक पध्दतीने/धनादेश/धनाकर्षाद्वारे विक्रेत्यास रक्कम अदा करणे बंधनकारक राहील.

उपरोक्त नुसार खरेदी करुन खरेदीची पावती या कार्यालयास अथवा मंडळ कृषि अधिकारी कार्यालयास कमाल 30 कार्यालयीन दिवसामध्ये अनुदान वाटपासाठी सादर करावी. जेणेकरून आपल्या आधार संलग्न बँक खात्यावर उपरोक्त नमूद अनुदानाची रक्कम जमा करणे शक्य होईल.

**(नाव व स्वाक्षरी)**
**तालुका कृषि अधिकारी,-----------------**
**तालुका - ................; जिल्हा- ............**

## प्रपत्र - ३

## कृषी कल्याण अभियान फेज -३

## जिल्हास्तरीय संयुक्त तपासणी पथकाचे प्रपत्र

1. तपासणीची तारीख
2. संयुक्त तपासणी पथकात समाविष्ट सदस्य

| तपासणी अधिकाऱ्याचे नाव | पदनाम | कार्यालयीन पत्ता |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |

3. अ)लाभधारकाचे संपूर्ण नाव, सविस्तर पत्ता
   ब)आधारकार्ड क्र., बॅन्केचा तपशील, दुरध्वनी क्र., इमेल आयडी
4. अ)लाभधारकाचा प्रवर्ग
   ब)प्रगतीशील शेतकरी/शेतकऱ्यांचे नोंदणीकृत गट /ग्रामीण उद्योजक
5. इतर अर्थसंस्थांचे अर्थसहाय्य घेतले असल्यास त्याचा सविस्तर तपशील
6. प्रस्तावीत प्रकल्पातील औजारे बॅन्कचा तपशील

| अ. क्र. | औजाराचे तांत्रीक नाव | प्रकल्पात नमुद केलेले नाव | बीलानुसार खरेदीची प्रत्यक्ष रक्कम | संयुक्त तपासणी पथकाने केलेली शिफारस |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| एकूण | | | | |

7. लाभधारका कडील उपलब्ध सुविधा
   अ)औजारे सुरक्षीत व सुस्थितीत ठेवण्यासाठी व्यवस्था/शेड
   ब)अनुभवी व प्रशिक्षीत मनुष्यबळ (संख्या)
   क)औजारे देखभाल व दुरुस्तीसाठी केलेली व्यवस्था
   ड)अभिलेख जतन करुन ठेवण्यासाठी केलेली व्यवस्था
   इ)इतर अनुषंगीक बाबी
8. यंत्रसामुग्री व औजारे यांच्या नोंदणीबाबत, विम्याबाबत, करभरणा, वॉरन्टीबाबत केलेली कार्यवाही
9. औजारे बॅन्क स्थापनेसाठी खरेदी केलेल्या औजारांची एकूण रक्कम
10. यंत्रसामुग्री व औजारे सुस्थितीत प्राप्त झाल्याबाबत लाभधारकाची लेखी सहमती
11. माफक दराने सेवा-सुविधा पुरवठ्याबाबत लाभधारकाची लेखी सहमती
12. अनुदान वजा जाता लाभधारकाने स्वनिधीतून भरलेली रक्कम₹
13. संयुक्त तपासणी पथकाने अनुदान रकमेसाठी केलेली शिफारस₹
14. इतर अनुषंगीक मुद्दे

**संयुक्त तपासणी पथकातील प्रत्येक सदस्याची स्वाक्षरी घ्यावी**

प्रपत्र - ४

## कृषि कल्याण अभियान फेज ३ : तपासणी अहवाल

१. तपासणी दिनांक :-

२. योजनेचे नाव :-

३. लाभार्थीचे नांव :- ---------------------------------------------

४. पत्ता- गाव :- ---------------------------, तालुका :- -------------------, जिल्हा :-

दुरध्वनी / मोबाईल क्र. :-

५. प्रत्यक्ष तपासणीत आढळून आलेल्या यंत्र/औजारांचा तपशील:-

| यंत्र/औजाराचे तांत्रीक नाव | यंत्र/औजाराचे उत्पादक कंपनीचे नाव | यंत्र/औजाराचे पुरवठादाराचे/ विक्रेत्याचे नाव | यंत्र/औजाराचा मॉडेल/मेक/ लॉट क्रमांक व एच. पी | यंत्र/औजाराचा तपासणी अहवाल क्र./BIS प्रमाणपत्र | यंत्र/औजार खरेदी दिनांक | यंत्र/औजार प्रत्यक्ष प्राप्त (डिलिव्हरी)दिनांक | ट्रॅक्टर चलित औजारांसाठी ट्रॅक्टरचा आवश्यक एच.पी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

८. बिलाचा व अनुदानाचा तपशील -

| अ.क्र. | औजाराचे तांत्रिक नाव /तपशील | बिलाचा तपशील | | | तपासणी अधिकाऱ्यांने अनुदानासाठी शिफ़ारस केलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| | | बील क्र. | दिनांक | बीलानुसार खरेदीची रक्कम | |
| १. | | | | | |
| | | | | | |

९. शेतकऱ्यांने खरेदी केलेल्या ट्रॅक्टर/यंत्र/औजाराची रक्कम स्वतःच्या बँक खात्यातुन दिली आहे काय? होय/नाही असल्यास त्याचा तपशील - इलेक्ट्रॉनिक पधतीने/धनादेश/धनाकर्ष -

१०. उत्पादक कंपनीने यंत्र/औजारावर परिक्षण अहवाल क्रमांक व मॉडेल क्रमांक कोरला आहे काय? होय/नाही.

११. शेतकऱ्यांने खरेदी केलेले ट्रॅक्टर/यंत्र/औजाराचे मॉडेल/मेक पुर्वसंमती पत्रात नमुद केल्यानुसार आहे काय? होय/नाही.

१२. यंत्रसामुग्री व औजारे यांच्या नोंदणीबाबत, विम्याबाबत, कर भरणा, वॉरन्टीबाबत केलेली कार्यवाही.

वरीलप्रमाणे ट्रॅक्टर/यंत्रे/औजाराची तपासणी मी स्वत: केली असून ट्रॅक्टर/यंत्रे/औजार सुस्थितीत असल्याचे आढळले. योजनेच्या मार्गदर्शक सुचनानुसार देय असलेली अनुदानाची रक्कम रक्कम रु. ............. (अक्षरी रुपये .......................) शेतकऱ्याचे बँक खात्यात जमा करण्यात आली आहे.

स्वाक्षरी :-

स्थळ :-

अधिकाऱ्याचे नाव :-

दिनांक :-

पदनाम :-

मुख्यालय :-

**प्रपत्र-५**

**<u>हमीपत्र नमुना</u>**

(₹ 1000/- च्या बॉन्ड पेपर वर)

**(कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्र पुरस्कृत कृषि यांत्रीकीकरण उपअभियानांतर्गत भाडे तत्वावर सेवासुविधा पुरविणारे केंद्र स्थापन करण्याबाबत लाभधारकाने द्यायचे हमीपत्र )**

मी,(संपूर्णनाववपत्ता),वय वर्षे , धारण केलेले पद केंद्राचा प्राधिकृत प्रतिनिधी याना त्याने कृषि विभागास **हमीपत्र** लिहून देतो की,

1. मी स्वत: कृषि यांत्रीकीकरण सेवा-सुविधा पुरवीण्यासाठी सक्षम असून त्या अनुषंगाने यापूर्वी केलेल्या कामांबाबत प्रमाणित तपशील सोबत जोडला आहे. / आमची संस्था नोंदणीकृत असून नोंदणी क्र.-------वर्ष---------- आहे.संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत सोबत सहपत्रीत केली आहे.

2. आमच्या संस्थेस कृषि क्षेत्राशी निगडीत कामाचा व्यापक अनुभव आहे. संस्थेच्या मेमोरॅन्डम ऑफ असोसिएशनमध्ये कृषि विषयक कामांचा स्पष्ट उल्लेख असून कृषि यांत्रीकीकरण सेवा-सुविधेचा संस्थेस अनुभव आहे.त्याबाबत कागदपत्रे सोबत सहपत्रीत केली आहेत.

3. कृषि विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या कृषि यांत्रीकीकरण उपअभियानांतर्गत भाडे तत्वावर सेवा सुविधा पुरविणारे औजारे बॅन्क स्थापणे व भाडे तत्वावर कृषि यांत्रीकीकरण सेवा सुविधा पुरविणारे केंद्रे स्थापन करण्याबाबत आमची संस्था इच्छूक असून त्यासाठी आवश्यक मनुष्यबळ व प्रशिक्षित तांत्रीक कर्मचारी वृंद आमच्याकडे/संस्थेकडे उपलब्ध आहे.

4. केंद्र स्थापन करण्यासाठी आमच्या जिल्ह्यातील पीक रचनेनुसार सर्व कृषि औजारांची सुरुवातीस स्वखर्चाने ₹...............लाख पर्यंत रकमेची औजारे खरेदी करण्यास मी/संस्था तयार आहे.त्यासाठी आवश्यकतेनुरुप बॅन्क कर्ज प्रकरण करण्याची जबाबदारी माझी/संस्थेची राहील व त्यासाठी येणारा सर्व खर्च मी/संस्था करेल.प्रत्यक्ष औजारे खरेदीनंतर अनुदानाची रक्कम औजारे खरेदीच्या पावत्या सादर केल्यानंतर व प्रत्यक्षत पासणी करुन आमच्या बँक खात्यात जमा केली जाईल याची मला सुस्पष्ट कल्पना असून त्यास माझी पूर्णत :संमती आहे.

5. अनुदानावर कृषि यांत्रीकीकरण सेवा-सुविधा केंद्रासाठी खरेदी करण्यात येणाऱ्या संयंत्रे/औजारे/उपकरणे यांचे किमान सहा वर्षे हस्तांतरण, पुर्नविक्री किंवा गहाणवट करता येणार नाही याची मला स्पष्ट कल्पना असून त्यास माझी संमती आहे.अशा प्रकारे हस्तांतरण, पुर्नविक्री किंवा गहाणवट केल्यास अनुदानापोटी मिळालेली संपूर्ण रक्कम व्याजासह एकरकमी वसूल करण्यास माझी विनाशर्त अनुमती आहे.

6. अनुदानाचा लाभ घेतल्याने त्याद्वारे प्राप्त करुन घेण्यात येणाऱ्या औजारांद्वारे/उपकरणांद्वारे जवळपासच्या गावात शेतकऱ्यांना भाडेतत्वावर कृषि यांत्रीकीकरण सेवा-सुविधा माफक दरात/शासनाने निर्धारीत केलेल्या दरात उपलब्ध करुन देण्यास मी बांधील राहील याची मला कल्पना असून त्यास माझी संमती आहे.

7. सदर संयंत्रे, औजारे, उपकरणे यांची निगा राखणे, देखभाल-दुरुस्ती करणे याची सर्वस्वी जबाबदारी आमची राहील, याची मला कल्पना असून त्यास माझी संमती आहे.

8. याबाबत शासनाने ठरवून दिलेल्या प्रपत्रात नियमीतपणे अहवाल सादर करण्याची माझी जबाबदारी आहे तसेच अभिलेख नोंदवही नमुना प्रपत्रात ठेवण्याची हमी मी देत आहे.

9. योजनेच्या मार्गदर्शक सुचनांनुसार अशा केंद्रांसाठी इतर लागू असणाऱ्या सर्व जबाबदाऱ्या पार पाडण्याची मी/संस्था हमी देत आहे.

10. वरील व या अनुषंगाने शासनास आवश्यक सर्व बाबी व नियमांचे पालन करण्याची मी/संस्था या हमीपत्राद्वारे हमी देत आहे.

**लिहून घेणार** **लिहून देणार**

(---------------------------------------) (---------------------------------)

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी पदनाम---------------------------

---------------------------------------

**साक्षीदार**

1. -----------------------------------------------------.

2. -----------------------------------------------------.

**(वरील हमी पत्र नमुन्यादाखल देण्यात येत असून याबाबत कायदेशीर तरतुदींचे अनुषंगाने सरकारी वकील किंवा विधी सल्लागारांच्या मदतीने आवश्यक ते स्थानीक गरजेनुरुप बदल करण्यास हरकत नाही.)**

## प्रपत्र -६

## कृषि औजारे बँकेने भाडे तत्वावर औजारे पुरवठ्याबाबत ठेवावयाच्या अभिलेख नोंदवहीचा नमुना

| अ. क्र. | तारीख | भाड्याने औजारे सेवा पुरविलेल्या शेतकऱ्याचे नाव | त्यांचा पत्ता, संपर्क दुरध्वनी क्र. | भाड्याने दिलेल्या औजारा चा प्रकार | वापराचा कलावधी (तास) | भाड्याचा दर (₹)औजार प्रकार निहाय रु/तास/दिवस क्षेत्र | भाड्याची एकूण रक्कम (₹) | कृषि औजारे बँक धारकाची स्वाक्षरी | तपासणी अधिकारी स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |

**सदर अभिलेख नोंदवही संबंधीत तालुका कृषि अधिकारी व उपविभागीय कृषि अधिकारी यांनी पहिल्या पानावर व शेवटच्या पानाव र प्रमाणित करुन स्वाक्षरी करावी. क्षेत्रीय भेटीच्या वेळी तपासणी करुन अभिप्राय नोंदवावेत.**